# पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण.

फोन क्रमांक :- ०२१७-२७३२००९/१० ई-मेल :- sp.solapur.r@mahapolice.gov.in

## प्रेस नोट दिनांक २८/०४/२०२०

## सोलापूर ग्रामीण पोलीसांच्या मदतीला विनामोबदला 'कोव्हिड वॉरिअर्स'

कोरोना विषाणुचा (कोव्हिड-१९) सोलापूर शहर व ग्रामीण भागात होत असलेल्या प्रादुर्भावच्या अनुषंगाने, सोलापूर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रात लॉकडाऊनच्या नियमांचे काटेकोरपणे पालन होणेकरीता सोलापूर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी यांचे मदतीकरीता प्रत्येक गावामध्ये **स्वयंस्पुर्ती विनामोबदला** काम करण्यास इच्छुक असणा-या स्वयंसेवकांची (**कोव्हिड वॉरिअर्स**) निवड करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. मनोज पाटील यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचीत केले आहे.

**कोव्हिड वॉरिअर्सच्या निवडीचे निकष :-**

१. RSP/NSS/MSW/D.Ed/B.Ed./महाविद्यालयातील इच्छुक विद्यार्थी.
२. BSF/Army/CRPF/CISF मधून सेवानिवृत्त झालेले.
३. गावातील भौगोलिक/सामाजिक माहिती असलेले.
४. मजबुत शरीरयष्टी, निरोगी व ५० वर्षापेक्षा कमी वय असलेले.
५. त्यांचेविरूध्द गुन्हे दाखल नसलेले, समाजात वर्तन चांगले असलेले व सामाजिक कामाची आवड असलेले.
६. कोव्हिड वॉरिअर्स हे पुर्णपणे स्वयंसेवक आहेत त्यामुळे त्यांना कोणताही मोबदला किंवा इतर प्रकारचे सवलती देण्यात येणार नाही.

वरील निकषावर काम करण्यास इच्छूक असणाऱ्या व्यक्तींना प्राधान्य देण्यात यावे याबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचीत केले आहे.

**कोव्हिड वॉरिअर्सची कर्तव्ये :-**

१. ज्या-त्या पोलीस ठाणेस त्यांना नेमुण दिलेल्या ठिकाणी कामकाज करतील.
२. गावामध्ये नव्याने बाहेर गावाहून येणारे लोकांची माहिती पोलीस ठाणेस कळवतील.
३. गावामध्ये कोरोना विषाणुचे आजाराच्या अनुषंगाने लक्षणे दिसणारे लोकांची माहिती पोलीस ठाणेस देतील. परंतु, सदर लोकांचे समक्ष जावून कोणीही तपासणी करणार नाही.
४. पोलीस ठाणे/पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना एखादया पिडीत व गरजू कुटुंबाकडून अत्यावश्यक वस्तूंची मागणी आल्यास संबंधितांना आवश्यक ते साहित्य त्यांचे कुटुंबापर्यंत घरपोच करण्याचे कामकाज करतील.
५. पोलीसांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करून पोलीसांना त्यांचे कामात मदत करतील.

कोव्हिड वॉरिअर्स यांना कोरोना विषाणु बाबत माहिती, काम करीत असताना स्वच्छता व सुरक्षतेच्या बाबत काळजी घेणे, पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रातील डॉक्टर यांचेकडून प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षण देताना सोशल डिस्टन्सिंगच्या नियमांचे पालन होईल याची दक्षता घेण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. जे कोव्हिड वॉरिअर्स हे उत्तम कामकाज करतील अशा कोव्हिड वॉरिअर्स यांना मा. पोलीस अधीक्षक श्री.मनोज पाटील यांचे कडून त्यांनी केलेल्या कामाबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

तरी ज्या व्यक्तींना विनामोबदला सामाजिक कार्य करण्याची आवड आहे, अशा व्यक्तींनी ते राहत असलेल्या संबंधित पोलीस ठाणेस संपर्क साधावा असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण श्री. मनोज पाटील व मा. अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण श्री. अतुल झेंडे यांनी सोलापूर ग्रामीण जिल्हयाकडील नागरीकांना याद्वारे केलेले आहे.

---- ००----

**प्रति,**

मा. संपादक,

२/- सदरचे बातमी आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणेस विनंती आहे.